चंद्र सलोखा...

हास्य तुझे लकबीचे, गाली मोहक तारा
मंतर वेळी संध्या, मनात वादळ वारा

पाहणे दुरून तुजसी, तैशा चोरून वेळा
कळवावे कैसे मनीचे, ओठांचा अल्लड चाळा

वाऱ्याला जमले हाय, तुलाच येऊन खेटे
उडवून तुझ्या बटांना , वेडावून मजला भेटे

अशीच सरते संध्या, मौनाचा घुसमट पंखा
नभात तोवरी रमला, ताऱ्यांशी चंद्र सलोखा

- सपु, सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com